# एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम, महाराष्ट्र
## सार्वजनिक आरोग्य विभाग

## नवीन करोना विषाणू - सद्यःस्थिती आणि उपाय योजना

दिनांक १३ फेब्रुवारी २०२०

प्रेस नोट

---

१२ फेब्रुवारीपर्यंत मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ३०,४४२ प्रवासी तपासण्यात आले आहेत. बाधित भागातून आलेल्या प्रवाशांचा शोध क्षेत्रीय सर्वेक्षणातूनही घेण्यात येत आहे. आजपर्यंत राज्यात बाधित भागातून १७७ प्रवासी आले आहेत.

१८ जानेवारी पासून ताप, सर्दी, खोकला अशी लक्षणे आढळल्याने राज्यातील वेगवेगळ्या विलगीकरण कक्षात आज पर्यंत ४३ जणांना भरती करण्यात आले आहे. आज पर्यंत भरती करण्यात आलेल्यापैकी ४२ जणांचे प्रयोगशाळा नमुने करोना करता निगेटिव्ह असल्याचा निर्वाळा एन आय व्ही पुणे यांनी दिला आहे. एका प्रवाशाचा प्रयोगशाळा अहवाल उद्यापर्यंत प्राप्त होईल. आजवर भरती झालेल्या ४३ प्रवाशांपैकी ४२ जणांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. सध्या १ जण नायडू रुग्णालय, पुणे येथे भरती आहे.

## चिनी प्रवासी नायडू रुग्णालयाच्या सेवेने भारावला

दिनांक ६ फेब्रुवारी रोजी नायडू रुग्णालयात एका चिनी प्रवाशाला त्याला विमानात उलटी झाली म्हणून भरती करण्यात आले होते. त्याचा प्रयोगशाळा नमुना निगेटिव्ह आला. परंतु १४ दिवस विलगीकरण आवश्यक असल्याने त्याला ११ फेब्रुवारी पर्यन्त नायडू रुग्णालयात भरती ठेवण्यात आले होते. ११ तारखेला या रुग्णालयातून डिस्चार्ज होताना हा ३१ वर्षीय तरुण अत्यंत भावूक झाला होता. " अचानक मला इथे भरती व्हावे लागले , भाषेचा प्रश्न होता. पण इथल्या डॉक्टर्स आणि नर्सेसनी मला खूप चांगली वागणूक दिली. खाणे, स्वच्छता, उपचार, नर्सिंग काळजी इतकी उत्तम होती की मी विलगीकरण कक्षात भरती आहे, असे माला वाटलेच नाही." असा अभिप्राय या अर्थशास्त्रात पदवीधर असलेल्या तरुणाने नोंदवला. या संकट समयी हा भावनिक प्रसंग डॉक्टर्स आणि आरोगी कर्मचा-यांची उमेद वाढविणारा आहे.


11 Feb 2020.
It was all a sudden that I've been sent here, and I was quite nervous because of the facility and language problems. However everyone was very helpful in this special time for Chinese people. everything is quite well manged include buying food / cleaning / nursing service. Even though it's an isolation, but it does not really feel so.

So again thanks everyone, doctors and nurses and other staff! Have a good luck in Job!

P.S 中国的小伙伴希望你们别因为啥事儿而被隔离呢。但如果被隔离，这里的医护人员还是非常乐于助人的，虽然英语不太好，但多多使用翻译器吧，他们会想办法帮助你们的！祝健康！

केंद्र सरकारच्या सूचनेनुसार वुहान शहरातून येणा-या सर्व प्रवाशांना भरती करण्याचे आणि त्यांचे प्रयोगशाळा निदान करण्याचे धोरण राज्यात राबविण्यात येत आहे. इतर बाधित भागातून येणा-या प्रवाशांचा पाठपुरावा १४ दिवसांकरता करण्यात येतो आहे. बाधित भागातून राज्यात आलेल्या एकूण १७७ प्रवाशांपैकी १०४ प्रवाशांचा १४ दिवसांचा पाठपुरावा पूर्ण झाला आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासह नांदेड, बुलढाणा, नागपूर, वर्धा, सांगली, अहमदनगर, अमरावती, पालघर,जळगाव,चंद्रपूर,

सातारा या जिल्ह्यातूनही चीन आणि इतर बाधित भागातून आलेल्या प्रवाशांचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| राज्य नियंत्रण कक्ष | ०२०/२६१२७३९४ टोल फ्री क्रमांक १०४ |

*****